## निशाणी क्र. १३९ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ६ विरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करून प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेणेसाठी दाखल केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रस्तूत कामी प्रतिवादी क्र.६ महादेव वासुदेव परब हे दि. १०/१२/२०१७ रोजी मयत झाले आहेत. प्रतिवादी क्र. ६ हे मुंबई येथे राहत होते. मार्च २०२० ते ऑगस्ट २०२१ पर्यंत कोरोना विषाणु संसर्गामुळे राज्यात शासनाने लॉकडाऊन घोषित केला होता. वादी हे मीरारोड येथे राहत असून ते डायलेसिसच्या आजाराने सुमारे ३ वर्षाहून अधिक काळ आजारी होते. तसेच, त्यांचे सुमारे ६ महिन्यापुर्वी डाव्या डोळयाचे पडद्याचे ऑपरेशन झाले आहे. तदपूर्वी ३ महिने अगोदर त्यांचे उजव्या डोळयाचे पडद्याचे ऑपरेशन झाले आहे. त्यांना आठवडयातून ३ वेळा डायलेसिससाठी जावे लागते. या सर्व प्रकारामुळे वादी यांना मयत प्रतिवादी क्र. ६ चे वारस मुदतीत दाखल करणे शक्य झालेले नाही, त्यामुळे प्रतिवादी क्र. ६ विरुध्द दावा अबेट झाला आहे. तरी वादीचा दावा पुढे चालविण्याच्या दृष्टीने अबेटमेंट आदेश रद्द करून प्रस्तूत प्रतिवादी क्र. ६ यांचे वारस दाखल करणेस परवानगी मिळावी अशी विनंती वादीने केली आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, अर्ज खोटा व खोडसाळ आहे. सबब अर्ज फेटाळण्यात यावा. सदर अर्ज मंजूर करणेचा झालेस वादी यास जास्तीत जास्त रक्कम भरणेचा आदेश करणेत यावा

अशी विनंती प्रस्तूत प्रतिवादी यांनी केली आहे.

३. वादी व प्रतिवादी यांच्यातर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रतिवादी क्र. ६ हे दिनांक १०/१२/२०१७ इ. रोजी मयत झाले आहेत, असे दिसून येते. प्रस्तूत प्रतिवादी हे मयत झाले आहेत, याबाबत वाद दिसून येत नाही. सदरचा दावा वाटप, पृथक कब्जा व निरंतर मनाईकरीता दाखल केला आहे. सदर दाव्यास प्रस्तूत प्रतिवादी चे वारस हे आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे अबेटमेंटचा आदेश रद्द करणे न्यायोचित वाटते. परिणामी प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, खालील आदेश पारीत करीत आहे:

**–आदेश –**

१. प्रस्तूतचा अर्ज रक्कम रु. २०० च्या खर्चासह मंजूर करण्यात येतो. सदरचा खर्च वादींनी प्रतिवादी क्र. ६ च्या वारसांना देणेचा आहे.

सही/–

( बी.आर.पाटील )

दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

स्थळ : देवगड

दिनांक: २७/१०/२०२१